RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MH/MR/South-322/2013-15

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ५, अंक ७७] शुक्रवार, डिसेंबर १३, २०१३/अग्रहायण २२, शके १९३५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २५.००

**असाधारण क्रमांक १४४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक १२ डिसेंबर २०१३.

**अधिसूचना**

**वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२.**

क्रमांक डब्ल्यू.एल.पी. ०९१३/प्र.क्र. ३१६/फ-१.— ज्याअर्थी, नवेगाव राष्ट्रीय उद्यान, नवेगाव वन्यजीव अभयारण्य, नागझिरा वन्यजीव अभयारण्य, नवीन नागझिरा वन्यजीव अभयारण्य व कोका वन्यजीव अभयारण्य मिळून ६५६३६.४८ हेक्टर एवढे क्षेत्र व्याघ्र संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण क्षेत्र ठरलेले आहे, आणि म्हणून या क्षेत्राला व्याघ्र राखीव क्षेत्राचा दर्जा देणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, तज्ञ समितीने, त्यांच्या दिनांक ७ सप्टेंबर २०१३ च्या अहवालानुसार शास्त्रीय व वस्तुनिष्ठ निकषानुसार उपरोक्त क्षेत्रापैकी ६५३६७.४२ हेक्टर राखीव वनक्षेत्र हे गाभा क्षेत्र किंवा अबाध्य (Critical) व्याघ्र अधिवास म्हणून अधिसूचित करण्यात यावे आणि व्याघ्र संवर्धनासाठी अबाधित ठेवावे म्हणून सूचित केलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, मुख्य वन्यजीव रक्षक, महाराष्ट्र राज्य यांनी शिफारस केल्यानुसार, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी उक्त सुरक्षित क्षेत्रे नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र म्हणून अधिसूचित करण्यास आणि उपरोक्त गाभा क्षेत्र किंवा अबाध्य व्याघ्र अधिवास म्हणून अधिसूचित करण्यासाठी, त्यांचे पत्र क्र. एफ.एन. १५(५)/२०१३-एनटीसीए, दिनांक २१ नोव्हेंबर २०१३ द्वारे मान्यता दिलेली आहे.

त्याअर्थी आता, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ (१९७२ चा ५३) याच्या कलम ३८ व्ही अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, या अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (५) मध्ये दिलेल्या उक्त पाचही सुरक्षित क्षेत्रांचे ६५६३६.४८ हेक्टर क्षेत्र हे " नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र " म्हणून घोषित करीत आहे. आणि अनुसूचीच्या स्तंभ (६) मध्ये दिलेले ६५३६७.४२ हेक्टर क्षेत्र हे, नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राचे गाभा क्षेत्र किंवा अबाध्य (Critical) व्याघ्र अधिवास म्हणून देखील घोषित करीत आहे. सदर क्षेत्र व्याघ्र संवर्धनासाठी अबाधित ठेवण्यात येत आहे. उक्त व्याघ्र राखीव क्षेत्राची व्याप्ती व हद्दी या अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये नमूद केलेल्या संबंधित अधिसूचनांमध्ये सुरक्षित क्षेत्रे म्हणून विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील ; आणि उक्त व्याघ्र राखीव क्षेत्रांतर्गत उक्त गाभा क्षेत्राची किंवा अबाध्य (Critical) व्याघ्र अधिवासाची व्याप्ती व हद्दी या अनुसूचीच्या स्तंभ (७) मध्ये दिल्याप्रमाणे नागझिरा वन्यजीव

अभयारण्याच्या वनखंड ९७ व १२५ मधील नागझिरा प्रशासनिक व पर्यटन संकुलाचे १७.६० हेक्टर क्षेत्र तसेच कोका वन्यजीव अभयारण्य संरक्षित वनांचे २५१.४६ हेक्टर क्षेत्र वगळता, व्याघ्र राखीव क्षेत्राला लागू असल्याप्रमाणे असतील.

## अनुसूची

### नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राचा तपशील

| अ. क्र. | सुरक्षित क्षेत्राचे नाव | सुरक्षित क्षेत्राचा अधिसूचना क्रमांक | सुरक्षित क्षेत्रातील क्षेत्र (हेक्टर) | नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र (हेक्टर) | नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव अंतर्गत गाभा किंवा अबाध्य व्याघ्र अधिवास असलेले क्षेत्र (हेक्टर) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | नवेगाव राष्ट्रीय उद्यान | डब्ल्यू.एल.पी. १०/२०००/प्रक्र. १९२/फ-१, दि. २१ डिसेंबर २००० | १२९५५.२० | १२९५५.२० | १२९५५.२० | संपूर्ण सुरक्षित क्षेत्र गोंदिया जिल्ह्यात असून, सर्व क्षेत्र गाभा क्षेत्र म्हणून अंतर्भूत आहे. |
| २ | नागझिरा वन्यजीव अभयारण्य | डब्ल्यू.एल.पी. १०९८/प्रक्र. १८५/फ-१, दि. २३ जुलै २००१ | १५२५८.२० | १५२५८.२० | १५२४०.६० | सुरक्षित क्षेत्र गोंदिया जिल्ह्यात असून, यापैकी खंड क्र. ९७ व १२५ मधील नागझिरा प्रशासनीक व पर्यटन संकुलाचे (१७.६० हे.) एवढे क्षेत्र गाभा क्षेत्रातून वगळलेले आहे. |
| ३ | नवेगाव वन्यजीव अभयारण्य | डब्ल्यू.एल.पी. १०-११/प्रक्र. ३१६/फ-१, दि. २८ फेब्रुवारी २०१२ | १२२७५.६७ | १२२७५.६७ | १२२७५.६७ | सुरक्षित क्षेत्र हे गोंदिया जिल्ह्यात असून संपूर्ण क्षेत्र गाभा क्षेत्र म्हणून अंतर्भूत आहे. |
| ४ | नवीन नागझिरा वन्यजीव अभयारण्य | डब्ल्यू.एल.पी. १०-११/प्रक्र. ३१६/फ-१, दि. २९ फेब्रुवारी २०१२ | १५१३३.५० | १५१३३.५० | १५१३३.५० | सुरक्षित क्षेत्र हे भंडारा व गोंदिया जिल्ह्यात असून संपूर्ण क्षेत्र गाभा क्षेत्र म्हणून अंतर्भूत आहे. |
| ५ | कोका वन्यजीव अभयारण्य | डब्ल्यू.एल.पी. ०४१३/प्रक्र. १५४/फ-१, दि. १८ जुलै २०१३ | १००१३.९१ | १००१३.९१ | ९७६२.४५ | सुरक्षित क्षेत्र हे भंडारा जिल्ह्यात असून यापैकी २५१.४६ हे. संरक्षित वनाचे क्षेत्र गाभा क्षेत्रातून वगळलेले आहे. |
| | | एकूण .. | ६५६३६.४८ | ६५६३६.४८ | ६५३६७.४२ | |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संजीव गौड,**
शासनाचे सह सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Marg, Mantralaya, Mumbai 400 032, dated the 12th December 2013.

*NOTIFICATION*

WILD LIFE (PROTECTION) ACT, 1972.

No. WLP. 0913/C.R.316/F-1.—Wheareas, the Nawegaon National Park, Nawegaon Wildlife Sanctuary, Nagzira Wildife Sanctuary, New Nagzira Wildlife Sanctuary and Koka Wildlife Sanctuary covering 65636.48 hectare area constitute vital areas for tiger conservation, and therefore, require status of a Tiger Reserve;

And whereas, the Expert Committee, *vide* its report dated the 7th September 2013, has recommended on the basis of scientific and objective criteria that an area of 65367.42 hectares of Reserved Forests, out of the abovesaid area should be notified as Core or Critical Tiger Habitat and kept as inviolate for the purposes of tiger conservation;

And whereas, on the recommendations of the Chief Wild Life Warden, Maharashtra State, the National Tiger Conservation Authority, Government of India, New Delhi has conveyed its approval to notify the above said Protected Areas as Nawegaon-Nagzira Tiger Reserve and to notify above said Core or Critical Tiger Habitat *vide* its letter No. F.N. 15 (5)/2013-NTCA, dated the 21st November 2013.

Now, therefore, in exercise of the powers conferred under section 38 V of the Wild Life (Protection) Act, 1972 (53 of 1972), the Government of Maharashtra hereby declares that 65636.48 hectare area of the above said five Protected Areas as given in column (5) of the Schedule appended with this notification as "Nawegaon-Nagzira Tiger Reserve" and also declares that 65367.42 hectare area as given in column (6) of the Schedule as Core or Critical Tiger Habitat of Nawegaon-Nagzira Tiger Reserve to be kept as inviolate for the purposes of tiger conservation with the situation and the limits of the said Tiger Reserves as specified for, as the Protected Areas in the respective notifications mentioned in column (3) of the Schedule; and the situation and the limits of the said Core or Critical Tiger Habitat within the said Tiger Reserve shall be as applicable to the Tiger Reserve excluding 17.60 hectare area of Nagzira Administrative and Tourism Complex in compartment no. 97 and 125 of Nagzira Wild Life Sanctuary as well as 251.46 hectare of Protected Forests in Koka Wildlife Sanctuary as given in column (7) of the Schedule.

*Schedule*

*Details of Area of Nawegaon-Nagzira Tiger Reserve*

| Sr. No. | Name of the Protected Area | Notification number of the Protected Area | Area with in the Protected Area (Ha.) | Area of the Nawegaon-Nagzira Tiger Reserve (Ha.) | Area of the Core of Critical Tiger Habitat in Nawegaon-Nagzira Tiger Reserve (Ha.) | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
| 1 | Nawegaon National Park | WLP. 10-2000/CR-192/ F-1, dated the 21st December 2000. | 12955.20 | 12955.20 | 12955.20 | Protected Area is located in Gondia District; the entire area is included in the Core. |

| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
|---|---|---|---|---|---|---|
| 2 | Nagzira Wildlife Sanctuary | WLP. 1098/CR-185/F-1, dated the 23rd July 2001. | 15258.20 | 15258.20 | 15240.60 | Protected Area is located in Gondia District; 17.60 ha. of Nagzira Administrative and Tourism Complex in compartment No. 97 and 125 is not included in the Core. |
| 3 | Nawegaon Wildlife Sanctuary | WLP. 10.11/CR-316/ F-1, dated the 28th February 2012. | 12275.67 | 12275.67 | 12275.67 | Protected Area is located in Gondia District; the entire area is included in the Core. |
| 4 | New Nagzira Wildlife Sanctuary | WLP. 10.11/C.R. 316/ F-1, dated the 29th February 2012. | 15133.50 | 15133.50 | 15133.50 | Protected area is located in Bhandara and Gondia District; the entire area is included in the Core. |
| 5 | Koka Wildlife Sanctuary | WLP. 0413/CR-154/ F-1, dated the 18th July 2013. | 10013.91 | 10013.91 | 9762.45 | Protected area is located in Bhandara District; 251.46 ha. of Protected Forest is not included in the Core. |
| | | Total .. | 65636.48 | 65636.48 | 65367.42 | |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANJEEV GAUR,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.